Divya city page No.4 dated 31-7-2018

# प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट अॅन्ड रिसर्चच्या ३११ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांत निवड

## प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अॅन्ड रिसर्च येथे कॅम्पस प्लेसमेंट

प्रतिनिधी | अमरावती



प्रा. राम मेघे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अॅण्ड रिसर्चमधील विविध कंपन्यांमध्ये निवड झालेले विद्यार्थी.

विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटीद्वारे संचालित प्रा. राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेतील ३११ विद्यार्थ्यांची विविध मल्टि नॅशनल कंपन्यांमध्ये निवड झाली. अभियांत्रिकी पदवी घेऊन बाहेर पडतानाच एक चांगल्या पगाराची नोकरी लागावी, असे प्रत्येक युवकाचे स्वप्न असते. महाविद्यालयातील प्लेसमेंट मुळे विद्यार्थ्यांचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

वर्षभर विविध कंपन्यांच्या प्लेसमेंट प्रक्रियेत निवड झालेल्या ३११ विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. अमोल बोडखे यांच्या हस्ते गौरवले. या प्रसंगी विभाग प्रमुख, प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. तुषार देशमुख, प्रा. रवी हिरूळकर, प्रा. श्रीकांत देशमुख, डॉ. सी. आर. पाटील, प्रा. मिलिंद मोहोड, प्रा. अनुप बुरंगे, प्रा. संग्राम दांडगे, स्मित ठाकूर, विनाद गावंडे, देवेंद्र बांडाबुचे उपस्थित होते. केपी आयटी कंपनीत आनंद पडोळे, दिव्या पिसोळे, मयूर फोकमारे, आदित्य शिरे, वैष्णवी खंडार, विवेक चव्हाण, अक्षय निमजे व य गुणवंत विद्यार्थ्यांनी तसेच टीसीएस कंपनीत निवड झालेल्या ७२ विद्यार्थ्यांचे निवडीत मुख्यत्वे आदित्य टावरी, चैताली तलवारे, ममता पारवानी, सुहानी राजा, ऐश्वर्या अजमिरे, भाविका द्विवेदी, अक्षय वडाळकर, दानिश मेमन, तुषार देशपांडे, विवेक काटेकर व अन्य विद्यार्थ्यांनी भावना व्यक्त केल्या. अॅमेझॉन कंपनीत निवड झालेले रोहित बार्वेकर, मनीषा वाटकर, शुभम ओझा, हॅव्लेट पॅकार्ड मध्ये एमसीएचे अनघा घोंगे, पूनम धोटे, विजय दुपारे, धूत ट्रान्समिशन प्रा. लि. मध्ये निवड झालेल्या ५९ विद्यार्थ्यांपैकी निशा भेदोडकर, अश्विनी शिंदे, चेतन उपाध्याय, गौरी बोंडे, पूजा माकोडे, असाही ग्लासमध्ये क्षितीज डेहनकर, जस्ट डायलमध्ये एमबीएचे अल्मास खान, नमिता मंत्री, निखील भुसाडे, रोशनी मडावी, खुशबू बरडिया, अबोली पाटील, टाटा एरोनॉटिक्समध्ये स्नेहल माळवी, प्रशांत गायकवाड, गौरव सत्तीवाले, प्रद्युम्न डावरे, अष्टविनायक इन्फ्रा मध्ये युवराज पवार, विद्या वाळके यांनी मनोगत व्यक्त केले. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, पंकज देशमुख, सचिव युवराज सिंह चौधरी, नितीन हिवसे, अॅड. उदय देशमुख, गजानन काळे, प्रा. रागिणी देशमुख, प्राचार्य डॉ. अमोल बोडखे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.